**BOD**

**2006**

**000199**

## मराठी वाङ्मय - I ( वैकल्पिक )

**स्तर : पदवी** | **एकूण गुण : 200**

**स्वरूप : पारंपारिक** | **कालावधी : 3 तास**

**सूचना :**

*(i)* *सर्व प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहावीत.*

*(ii)* *प्रश्न क्रमांक 1 हा* ***अनिवार्य आहे.*** *उर्वरित प्रश्नांपैकी प्रत्येक विभागातून एक, याप्रमाणे चार प्रश्न सोडवा.*

*(iii)* *प्रश्नाच्या उजवीकडील अंक त्या प्रश्नाचे गुण दर्शवितात.*

*(iv)* *ज्या क्रमाने निर्धारित संख्येपर्यंत पर्यायी प्रश्नसंख्या सोडविली आहे, तेवढीच प्रश्नसंख्या तपासली जाईल, अतिरिक्त उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(v)* *तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास जास्त गुण देण्यात येतील.*

*(vi)* *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत: किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

*(vii)* *प्रत्येकी 10, 15 आणि 20 गुण असलेल्या प्रश्नांची उत्तरे परिक्षार्थींकडून अनुक्रमे 125, 175 आणि 250 शब्दांमध्ये अपेक्षित आहेत.*

**1. खालीलपैकी कोणतेही चार उपप्रश्न सोडवा. ( प्रत्येकी 10 गुण )**

(a) प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यातील परस्परसंबंध स्पष्ट करा. **10**

(b) 'भाषांतर' म्हणजे काय ? भाषांतराची उपयुक्तता स्पष्ट करा. **10**

(c) 'नवकथा' या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये लिहा. **10**

(d) फ्राईड प्रणित 'मानसशास्त्रीय समीक्षा' पद्धतीची आधारतत्त्वे कोणती ? **10**

(e) 'दृकश्राव्य' संपर्क माध्यमाच्या भाषेची वैशिष्ट्ये लिहा. **10**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग - अ

2. **खालील उपप्रश्न सोडवा.**

(a) मराठी भाषेच्या उत्पत्ती संदर्भातील विविध मतांचा परामर्श घ्या. 10

(b) अहिराणी बोलीभाषाचे 'क्षेत्र-स्वरूप-वैशिष्ट्ये' संदर्भात सोदाहरण माहिती लिहा. 10

(c) 'शब्द' म्हणजे काय? विकारी शब्द प्रकारांचे वर्णन करा. 10

(d) मराठातील तीन काळांची वैशिष्ट्ये लिहून प्रत्येकी दोन उदाहरणे लिहा. 10

3. **खालील उपप्रश्न सोडवा.**

(a) यादवकालीन मराठी भाषेची वैशिष्ट्ये लिहा. 10

(b) आधुनिक भाषाविज्ञानातील 'स्वन-स्वनिम-रचनांतरे' ही संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा. 10

(c) 'सर्वनाम' म्हणजे काय? मराठी व्याकरणकार दामले यांनी सूचित केलेल्या सर्वनामांच्या प्रकारांचा परिचय करून द्या. 10

www.mpscmaterial.com

(d) महाराष्ट्र शासनमान्य कोणतेही पाच शुद्धलेखनाचे नियम लिहा. 10

## विभाग - ब

4. **खालील उपप्रश्न सोडवा.**

(a) भाषिक संपर्काची कारणे कोणती? इंटरनेट आणि कॉम्प्युटर या संपर्कमाध्यमाची उपयुक्तता स्पष्ट करा. 15

(b) 'लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार आहे' असे कां म्हणतात ते सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) 'गोंधळ' या लोकनाट्य प्रकाराचा परिचय करून द्या. 10

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

5. **खालील उपप्रश्न सोडवा.**

(a) शासन व्यवहारात 'राजभाषा' म्हणून मराठीचा विकास व त्यामधील अडचणी संदर्भात विवेचन करा. 15

(b) 'लोकगीत' म्हणजे काय? स्त्रियांच्या परंपरागत लोकगीत प्रकारांचा परिचय करून द्या. 15

(c) 'पंचतंत्र' या प्राचीन भारतीय लोककथांचे वेगळेपण स्पष्ट करा. 10

## विभाग - क

6. **खालील उपप्रश्न सोडवा.**

(a) महानुभावपंथाचे प्रवर्तक कोण? पंथीय तत्त्वज्ञानाचा परिचय करून द्या. 10

(b) संत ज्ञानदेवांच्या सांस्कृतिक कार्याचा परिचय करून द्या. 10

(c) केशवसुतांना 'आधुनिक मराठी कवितेचे जनक' असे कां म्हणतात? 10

(d) 'दलित साहित्य' या वाङ्मयीन प्रवाहाच्या प्रेरणा स्पष्ट करा. 10

7. **खालील उपप्रश्न सोडवा.**

(a) 'बखर' म्हणजे काय? शिवकालीन बखरींचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करा. 10

(b) 'पोवाडा' या शाहिरी वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्यै लिहा. 10

(c) राम गणेश गडकरी लिखित 'एकच प्याला' या नाटकाचे वेगळेपण विशद करा. 10

(d) मराठी साहित्यातील 'स्त्रीवादी प्रवाहाच्या' प्रेरणा स्पष्ट करा. 10

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग - ड

**8. खालील उपप्रश्न सोडवा.**

(a) समीक्षेच्या क्षेत्रातील 'लेखक-कलाकृती-वाचक' यांच्यातील परस्पर संबंध विशद करा. 10

(b) ऐतिहासिक समीक्षा पद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा. 10

(c) भारतीय साहित्यविचारात 'भरतमुनींच्या रससिद्धान्ताचे' महत्त्व कोणते ते लिहा. 10

(d) ॲरिस्टॉटल-प्रणित 'अनुकृतीसिद्धांताची' प्रमुख तत्त्वे लिहा. 10

**9. खालील उपप्रश्न सोडवा.**

(a) वाङ्मयीन समीक्षेचे प्रयोजन स्पष्ट करा. 10

(b) वास्तववादाचे स्वरूप व प्रेरणा स्पष्ट करा. 10

(c) मम्मटाने सांगितलेली काव्याची प्रयोजने कोणती ? 10

www.mpscmaterial.com

(d) 'लॉजायनस' या पाश्चात्य साहित्यसमीक्षकाने मांडलेल्या भव्योदात्त सिद्धान्तांचे पाच प्रमुख घटक कोणते ते लिहा. 10

-oOo-

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial